# कल्याण डोंबिवली महानगरपालिका,कल्याण
## जलनि:सारण विभाग

जा.क्र.कडोंमपा/काअ/जनि:/ ७९
महापालिका कार्यालय, कल्याण.
दि१३/०१/२०२३

**-: बांधकाम पूर्णत्वाचा ना-हरकत दाखला :-**

**प्रति,**
श्री.मंगेश दशरथ गायकर व इतर,
कु.मु.प.धा. :- साई श्रद्धा डेव्हलपर्स तर्फे विकास कोकणे,
वास्तु :- श्री.अनिल निरगुडे, कल्याण.

**विषय** :- जलनि:सारण विभागाचा बांधकाम पूर्णत्वाचा ना-हरकत दाखला.
**संदर्भ** :- वरील विषयाबाबतचा श्री.अनिल निरगुडे (वास्तु) कल्याण (प.), दि.१४/१२/२०२ रोजीचा अर्ज.
**मालक** :- ~~श्री.लक्ष्मण खेतशी पटेल व इतर.~~ श्री मंगेश गायकर व इतर
**सुधारित बांधकाम परवानगी क्र** :- कडोंमपा/नरवि/बांप/कवि/२०१८-१९/४९/१०३, दि.०१/०६/२०२२.
**ईमारत पत्ता** :- स.नं.६०/६, ६६/२/२, ६६/३/२, ६६/४/२, सि.स.नं.४४३१, ४४३३, मौजे- मोहने, ता-कल्याण या भूखंडावर बांधण्यात आलेल्या फक्त "विंग ए" स्टिल्ट + १५ या इमारतीकरिता तसेच उर्वरित इमारतींसाठी त्यावेळी असणाऱ्या बांधकामानुसार तपासणी करून पुढील **अटी व शर्ती नुसार ना-हरकत दाखला** देण्यात येइल.

**महोदय,**

उपरोक्त विषयांकित भूखंडाची प्रत्यक्ष जागेवर पाहणी केली असता आपण सादर केलेल्या नकाशाप्रमाणे आपणास बांधकाम पूर्ण झालेल्या इमारतीस खालील अटी व शर्तीवर जलनि:सारण विभागाचा **बांधकाम पूर्णत्वाचा ना-हरकत दाखला** देण्यात येत आहे.

१) आपण आपला वरील भूखंड विकसित केल्यामुळे भविष्यात शेजारील रहिवाश्यांना तसेच शेजारच्या भूखंडात सांडपाणी व पावसाळी पाणी साचणार नाही किंवा जाणार नाही याची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर राहील.

२) सदर ठिकाणी मोहने रोड येथे २४ मीटर रुंदीच्या रस्त्याला भूखंडालागत पक्की गटार बांधलेली आहे. तसेच मोहने क्रॉस २४ मीटर रुंदीच्या रस्त्यालगत गटारीचे बांधकाम समुर्ण भूखंडावर प्रस्तावित इमारतींच्या बांधकामादरम्यान करण्यात येईल असे साई श्रद्धा डेव्हलपर्स लिहुन दिलेले हमिपत्र आपणावर बंधनकारक राहील. तसेच रस्त्याच्या कडेला बांधण्यात येणाऱ्या / बांधलेल्या गटारीच्या भिंतीवर भविष्यात आपणास कोणत्याही प्रकारे बांधकाम करता येणार नाही अन्यथा तसे केल्यास तोडण्याचा महापालिकेला कायदेशीर अधिकार राहील.

३) आपण आपला भुखंड विकसित करीत असल्यामुळे भविष्यात बाजू लगतच्या सर्व भूखंडामध्ये सांडपाणी व पावसाळी पाणी साचणार नाही किंवा जाणार नाही याची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर राहील. याकरिता उपाययोजना म्हणून आपण विकसित करीत असलेल्या भूखंडाअंतर्गत संरक्षक भिंतीलगत आवश्यक क्षमतेचे व मार्गिकेप्रमाणे सी.सी.गटार बांधण्यात यावे. तसेच सदर बांधकाम नंतरचे नाल्यात / गटारात पडलेले बांधकामाचे साहित्य / मटेरियल त्वरित बाहेर कडून टाकावेत.

४) सदर ठिकाणी गटार अथवा नाल्याचे बांधकाम पूर्ण झाल्यावर महापालिकेला जागेसाहित हस्तांतरित करावयाचे आहे.

५) आपण विकसित करीत असलेल्या भूखंडामध्ये मोठ्या आकाराचे गटार / नाला असल्यास त्यास बाधा होईल अशी झाडे लावू नये.

६) आपण बांधलेल्या गटाराची वेळोवेळी देखभाल दुरूस्ती व साफस फाई करणे आपल्याला बंधनकारक राहील.

७) आपल्या भूखंडात असलेल्या नाला अथवा गटार साफसफाईसाठी मशीनरी ने-आण करण्याकरिता (उदा.पोकलन, जे.सी.बी, डंपर इ.) तसेच सफाई कर्मचारी आपल्या संकुलामधून जाण्यास, संकुलातील रहिवासी भविष्यात कुठलीही हरकत घेणार नाही.

८) मशीनरी ने-आण करताना आपल्या संकुलातील कोबा अथवा रस्ता तुटणार / डॅमेज होणार नाही यासाठी ते उच्च प्रतीच्या कॉन्क्रिटने अथवा उच्च प्रतीच्या खडीकरणाने करण्यात यावे जेणेकरून संकुळातील रहिवासी कोणत्याही प्रकारची हरकत घेणार नाही. कोबा अथवा रस्ता तुटल्यास त्यास महापालिका जबाबदार राहणार नाही.

९) रस्त्याच्या कडेला आपण बांधलेल्या अंतर्गत गटारीवर आपण स्लॅब टाकल्यास सफाईसाठी प्रत्येक ५.०० मीटर अंतरावर २.५० फुट X ३.५० फुट या आकाराची हेवीड्युटी लोखंडी फ्रेम व झाकण बसविणे आपल्यावर बंधनकारक राहील जेणेकरून वाहन गेल्यास ते तुटणार नाही.

१०) आपण विकसित करीत असलेल्या भूखंडातुन पाण्याचा निचरा वाहत असल्यास तो इकडील परवानगी शिवाय वळवू नये अथवा बंद करू नये.

११) विकसित करण्यात येत असलेल्या भूखंडाबाबत आपण काही चुकीची माहिती दिली आहे असे निदर्शनास आल्यास सदरची परवानगी रद्द करण्यात येईल व आपणावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

१२) पावसाचे पाणी / सांडपाणी वाहून येणाऱ्या गटाराला / नाल्याला बाधित होईल अशा तऱ्हेचे कुठल्याही प्रकारचे बांधकाम करण्यात येऊ नये.

१३) भूखंडाच्या मोकळ्या जागेतून (Open Space) भविष्यात महापालिकेला नाला अथवा गटार बांधावयाची असल्यास किंवा नाल्याचे अथवा गटारीचे रुंदीकरण करावयाचे असल्यास नाल्यास अथवा गटारीस लागणारी आवश्यक तेवढी जागा महापालिकेला विनामूल्य देणे आपल्याला बंधनकारक राहील.

१४) सदर ठिकाणी मोहने रोड येथे २४ मीटर रुंदीच्या रस्त्याला भूखंडालागत पक्की गटार बांधलेली आहे. भूखंडाच्या पावसाळी पाण्याचा निचरा नैसर्गिक प्रवाहानुसार होत असून भविष्यात सदर मिळकत धारकास पाणी साचुन समस्या उद्भवल्यास त्याच्या निराकरणाची जबाबदारी संबंधित मिळकत धारकाची राहील.

१५) उपरोक्त विषयांकित भूखंडावरील यापूर्वी बांधकाम प्रारंभ वेळेस जलनि:सारण विभागाकडील प्रदान केलेल्या ना-हरकत दाखल्यामधील नमूद अटी व शर्ती आपणावर बंधनकारक राहील.

वरीलपैकी कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ मधील प्रकरण बारा च्या तरतुदीनुसार आपल्यावर कारवाई करण्यात येईल व सदरचा ना-हरकत दाखला आपोआप रद्द होईल. याबाबत आपणास वेगळे पत्र दिले जाणार नाही.

(घनश्याम नावंगुळ)
कार्यकारी अभियंता (जनि:/मनि:),
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

**प्रत.** :- सहाय्यक संचालक / नगररचना विभाग क.डों.म.पा. कल्याण यांचे माहितीस्तव व पुढील योग्य कार्यवाही स्तव सादर.